मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# नरेंद्र मोदींच्या विरोधात प्रचंड मोठी लाट

## सांगवीतील जाहीर सभेत महाविकास आघाडीच्या नेत्यांचा मोदी सरकारवर प्रहार

**पिंपरी | प्रतिनिधी**

देशातील ही लोकसभेची निवडणूक अत्यंत महत्त्वाची आहे.आर्थिक भ्रष्टाचाराबरोबर नैतिक व राजनैतिक भ्रष्टाचार मोदी सरकारकडून सुरू आहे. महागाईमुळे कंबरडे मोडले आहे. मोदी सरकार शेतकऱ्यांचा सूड घेत आहे. देशभरात नरेंद्र मोदींच्या विरोधात प्रचंड मोठी लाट आहे, अशा शब्दात काँग्रेस नेते तथा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी बुधवारी (दि.8 मे) सांगवी येथील महाविकास आघाडीच्या सभेत मोदी सरकार व भाजपवर सडकून टीका केली.

शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे)-काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)-शेतकरी कामगार पक्ष-स्वराज इंडिया-मित्र पक्ष महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ सांगवीतील पीडब्लूडी मैदानावर पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची सभा पार पडली. या सभेत ते बोलत होते. पृथ्वीराज चव्हाण पुढे म्हणाले, मोदी सरकारमुळे बेरोजगारीचे भूत देशाच्या मानगुटीवर बसले. नोटबंदी, जीएसटी, शेतकरी काळे कायद्यांमुळे त्यांना अर्थव्यवस्था सांभाळता आलेली नाही. डिझेल, पेट्रोलच्या किंमती वाढवून देश महागाईच्या घाईत लोटला. मनमोहन सिंह यांच्या काळातील आर्थिक विकासाचा दर राहिलेला नाही. आमदारांची खरेदी-विक्री करून सरकारे पाडली जात आहेत. त्यांच्या मान्यतेने राज्य सरकारे पाडली जातात. ना खाऊंगा, ना खाने दुंगा म्हणणा-या मोदींचे सर्वात भ्रष्ट सरकार ते चालवत आहेत. भाजपच्या काळात पिंपरी चिंचवडमध्ये सर्वात मोठा भ्रष्टाचार आहे. महागाईमुळे कंबरडे मोडले आहे. शेतकऱ्यांचा मोदी सूड घेत आहेत.




साखरेवर, कांद्यावर निष्ठूरपणे निर्यातबंदी करून कोट्यवधी शेतकऱ्यांचे नुकसान केले. निर्यात बंदी उठवून पुन्हा भरमसाठ कर लावला. शेतक-याला दिलेले एकही आश्वासन त्यांनी पूर्ण केलेले नाही. मोदींच्या विरोधात प्रचंड मोठी लाड तयार झालेली आहे. काँग्रेस पक्षाचे उत्कृष्ट जाहीरनामा दिलेला आहे. सर्व घटकांना न्याय देण्याचे काम इंडिया आघाडीचे सरकार करणार आहे. सत्तेचा मलिदा खाण्यासाठी आमदार फरपटत गेले. पण मतदार त्यांना धडा शिकविणार आहेत. महाराष्ट्रातील जनतेला फितुरी, गद्दारी, विश्वासघात चालत नाही. संजोग वाघेरेंच्या निमित्ताने चांगला खासदार निवडून द्या आणि उध्दव ठाकरेंचे हात बळकट करा, असे आवाहन त्यांनी केले.

### मोदीजींची फक्त खोटं बोलण्याची गॅरंटी

» खासदार संजय सिंह म्हणाले, इथे असलेली गर्दी दाखवते की संजोग वाघेरे विजयी होत आहेत. उध्दव ठाकरे यांनी अरविंद केंजरीवाल यांना अटक झाल्यानंतर दिल्लीत येऊन साथ दिली. ठाकरेंनी पाठ दाखवून कोणाला धोका दिलेला नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमीतून हाच संदेश देतो की, ज्यांनी उध्दव ठाकरे व शरद पवार यांच्यासोबत गद्दारी केली, त्यांना माफ करू नका. बाईकचोर, सोनेचोरानंतर देशात पक्ष चोरणारे आलेले आहेत. मोदीजींची फक्त खोटं बोलण्याची गॅरंटी आहे. बेरोजगारी, महागाई, काळा पैसा, 15 लाख देणे, पक्के घर देण्यावरून खोटी गॅरँटी दिली. देशातील जतना त्यांना हरविण्यासाठी तयार आहे. ते जिंकले, तर संविधान, आरक्षण, निवडणूक संपवतील. त्यांचे हगे राजकारण संपविण्यासाठी गेल.

# तळेगाव मधील 60 केंद्रांवर मतदानाची तयारी

## मावळ लोकसभा मतदार संघासाठी 13 मे रोजी मतदान : तळेगाव शहरात 59 हजार 346 जण मतदार

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदार संघासाठी 13 मे रोजी मतदान होणार आहे. तळेगाव दाभाडे शहरात 60 मतदान केंद्र आहेत. तळेगावला कोटेश्वरवाडी येथील एक व शेलारवाडी येथील दोन मतदान केंद्र जोडण्यात आली आहे. शहरात 59 हजार 346 जण मतदार आहेत.अशी माहिती तळेगाव दाभाडे मंडल अधिकारी बजरंग मेकाले यांनी दिली.

मावळ लोकसभा क्र.33 मधील 204 मावळ विधानसभा मतदारसंघातील तळेगाव दाभाडे महसूल हद्दीत कोटेश्वरवाडी-केंद्र 1 व शेलारवाडी- केंद्र 2 धरून एकूण 63 मतदान केंद्र आहेत. यामध्ये एकूण मतदान 62321 एवढे असून पुरुष मतदार 32264 तर महिला मतदार 30057 असल्याची माहिती तळेगाव दाभाडे मंडल अधिकारी बजरंग मेकाले यांनी दिली.

13 मे 2024 रोजी सकाळी 7 ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत मतदान होणार असून मतदान केंद्रावरील सर्व तयारी पूर्ण होत असल्याचे चित्र दिसत आहे. मावळ तालुक्यात तळेगाव दाभाडे हे गाव मोठी मतदार संख्या असलेले गाव म्हणून ओळखले जाते. यामध्ये एकूण 60 मतदान केंद्र असून त्यामध्ये अनुक्रमे मतदान केंद्र शाळेचे ईमारतीचे नाव, ईमारती मध्ये असलेली मतदान केंद्र संख्या,एकूण मतदार पुढील प्रमाणे –




सरस्वती विद्या मंदिर शाळा तपोधाम कॉलनी वराळे रोड, केंद्र 6 संख्या, 5696 मतदार. इंद्रायणी महाविद्यालय तळेगाव चाकण रोड, केंद्र 8 संख्या, 7211 मतदार. संत ज्ञानेश्वर प्रा.शाळा (गुलाबी शाळा), केंद्र 9 संख्या, 8931 मतदार. नवीन समर्थ विद्यालय (नूतन), केंद्र 3 संख्या, 4043 मतदार. लोकमान्य टिळक प्रा. शाळा क्र.6 (गवत बाजार जवळ), केंद्र 7 संख्या, 6440 मतदार. वीर जिजामाता कन्या शाळा क्र. 5 , केंद्र ८संख्या, 7559 मतदार. थोर समाज सेवक नथुभाऊ भेगडे शाळा क्र. 1, केंद्र 10 संख्या 10483 मतदार. सुभाष चौक जुनी भाजी मंडई, केंद्र 4 संख्या, 4207 मतदार. गणेश मोफत वाचनालय शाळा चौक, केंद्र 2 संख्या, 2033 मतदार. चावडी चौक (तलाठी कार्यालय), केंद्र 2 संख्या, 1402 मतदार. कैकाडी समाज मंदिर (भेगडे आळी),केंद्र1 संख्या, 1341 मतदार. (फक्त तळेगाव दाभाडे हद्दीत एकूण मतदान केंद्र – 60, मतदार संख्या – 59346 अशी आहे.)

# बिनकामाच्या खासदाराला आता घरी बसवा

## महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटलांची अमोल कोल्हेंवर सडकून टीका

**पुणे | प्रतिनिधी**

चौथ्या टप्यात मतदान होत असलेल्या शिरूर लोकसभा मंतदारसंघावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लक्ष केंद्रित केले आहे. या मतदारसंघात राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी अशी लढत आहे. शिरूर चे खासदार डॉ. अमोल कोल्हे हे माझ्यावर टीका करतात की, मी पालकमंत्री असताना त्यांनी माझ्याकडे मतदारसंघासाठी निधी मागितला; मात्र मी दिला नाही असे ते खोटे बोलत आहेत. त्यांना मतदारसंघापेक्षा मालिकेचे शूटिंग महत्वाचे आहे. गेल्या पाच वर्षांत त्यांना चाकण येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवता आला नाही, वाहतूक कोंडीत लोकांचे दोन दोन तास वाया जात आहे. त्यामुळे शिरूर लोकसभा मतदारसंघाच्या विकासासाठी आढळराव पाटील यांना दिल्लीत पाठवा, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.





महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारार्थ लोणी येथे आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, आंबेगाव तालुक्यातील लोणी, धामणी, वडगावपीर, मांदळवाडी, शिरदाळे तसेच सातगाव पठार, खेड, शिरूर, जुन्नर तालुक्यातील काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा तसेच शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. येथून आपल्या विचारांचा खासदार निवडून दिल्यास राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून पाण्याच्या विविध योजनेसाठी निधी उपलब्ध करून पाणीप्रश्न मार्गी लावू असे आश्वासन पवार यांनी दिले.

जुलैमध्ये आम्ही महायुतीच्या सरकारमध्ये सामील झालो. त्यामुळे आंबेगावात ६०० कोटींची कामे मार्गी लावता आली. ८ दिवसांत हिरड्याच्या नुकसानीची १७ कोटींची भरपाई दिली. जिल्हा नियोजनमधून आंबेगावसाठी ६८ कोटी रुपये निधी दिला. सत्तेशिवाय काही उपयोग नाही, आम्ही जर सत्तेत नसतो तर ही कामे झाली असती का? असा सवाल उपस्थित करत भाजपा सोबत जाण्याच्या आपल्या निर्णयाचे समर्थन केले.

आढळराव पाटील म्हणाले, पंधरा वर्षे खासदार असताना व खासदार नसतानाही मी जनतेसाठी काम केले. जनतेच्या सुखदुःखात, लग्नाच्या, दशक्रियाच्या कार्यक्रमात सहभागी झालो, यात कमीपणा कसला? मी खासदार नसतानाही गावागावात निपी टाकण्यासाठी प्रयत्न केला आहे विविध विकासकामे मार्गी लावले आहेत. विद्यमान खासदारांना फोन केला की त्यांचे पीए उचलतात व मीच खासदार बोलत आहे, असे सांगतात, खासदारांचा ८० सत्यांची टक्के निधी परत गेला, असे मी पेपरात वाचले. त्यामुळे जनतेने बिनकामाच्या खासदाराला घरी बसवावे.

आपल्या खासदाराने त्यांच्या कोपरे या दत्तक गावाच्या तोंडाला पाने पुसली. पाणीटंचाईत तेथील महिलांना दोन ते अडीच किमी पायपीट करुन पाणी आणायला लागत असताना, त्यांनी गाव वाऱ्यावर सोडले. पण माझ्या संस्था आणि कार्यकर्त्यांकडून दोन महिन्यांपासून तेथे टँकर सुरु आहे. त्यामुळे कोणतेही काम न करता, आरोप करणाऱ्या निष्क्रीय खासदाराला त्याची जागा दाखवायलाच लागेल. असे आढळराव पाटलांनी सांगितले.

# पुण्यात राज ठाकरेंची तोफ धडाडणार

## पुणे लोकसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारार्थ राज ठाकरेंची सभा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे लोकसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारार्थ महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे तोफ पुण्यात धडाडणार आहे. पुण्यातील सारसबाग परिसरात येत्या उद्या सायंकाळी 6 वाजता आयोजित करण्यात आली आहे. महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिल्यानंतर राज ठाकरे यांची लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही दुसरी सभा असणार आहे. आधी नारायण राणे यांच्या प्रचारार्थ सभा झाल्यानंतर उद्या पुण्यामध्ये सभा होणार आहे. या आधी सभेच्या



नियोजनासाठी मनसे कार्यालयात भाजप आणि मनसेच्या नेत्यांची महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत राज ठाकरे यांच्या सभेचं योग्य पद्धतीने नियोजन करण्यात येणार आहे.

या सभेसंदर्भात बाळा नांदगावकर यांनी माहिती दिली. ते म्हणाले की, पुणेकर मतदार विशेषतः युवक राज ठाकरे यांचे विचार ऐकण्यास उत्सुक असतो. मनसेला मानणारा मोठा मतदार पुणे लोकसभा मतदारसंघात आहे. मनसेचे सर्व कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोहोळ यांच्या प्रचारात एकदिलाने उतरले आहेत. ही सभा यशस्वी करण्यासाठी आम्ही सर्व जण काम करत आहोत. सभेला चांगली गर्दी होईल असा विश्वास आहे. सभास्थानी प्रत्यक्ष जाऊन पाहाणी केली आणि आढावा घेतला. वाहतुकीची कोंडी होणार नाही यासाठी प्रयत्न करीत आहोत.

### शिवाजी पार्क मैदान कोणाला मिळणार

17 मेला महाविकास आघाडी आणि महायुती दोघांकडून होणार शक्तिप्रदर्शन आणि प्रचाराच्या सांगता सभेचे आयोजन करण्यात आलं आहे. त्यासाठी शिवसेना ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना दोन्ही पक्षाकडून शिवाजी पार्कवर सभा घेण्यासाठी महापालिकेकडे अर्ज केला आहे. मात्र परवानगी संदर्भात महापालिकेकडून अद्याप कुठलाही निर्णय नाही. 2016 च्या शासन निर्णयानुसार दोन्ही पक्षांचे अर्ज निवेदनासह राज्य सरकारकडे पाठवण्यात आल्याची महापालिकेने माहिती दिली आहे. या सगळ्यासंदर्भात महाराष्ट्र राज्य नगर विकास विभाग यासंदर्भात लवकरच निर्णय घेणार असल्याची माहिती आहे.

# जो महाराष्ट्राला नडेल, त्याला महाराष्ट्र गाडेल

## येत्या 4 जूननंतर तुम्ही फक्त नरेंद्र मोदी, पंतप्रधान इंडिया आघाडीचाच होणार : उद्धव ठाकरे

**पिंपरी | प्रतिनिधी**

ज्या शिवसेनेने तुम्हाला पंतप्रधानपदापर्यंत पोहोचवलं, त्यांना तुम्ही नकली सेना म्हणता? तुम्ही माझ्या नाही, महाराष्ट्राच्या पाठीत वार केला. भरभरून आशिर्वाद दिल्यानंतर देखील सगळे उद्योग-धंदे गुजरातला नेले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात प्रेमाने अलिंगन दिले, तर आम्हीही देवू. पण, पाठीत वार केला, तर वाघनखाने पलटवार करू. जो महाराष्ट्राला नडेल, त्याला अशाच पध्दतीने महाराष्ट्र गाडेल, अशा शब्दात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी नरेंद्र मोदी आणि भाजपवर तोफ डागली. तसेच, मोदीजी 4 जूननंतर तुम्ही फक्त नरेंद्र मोदी राहाल. पंतप्रधान आमच्या इंडिया आघाडीचा होईल. इंडिया आघाडीचे सरकार आल्यानंतर महाराष्ट्राचे लुटलेले वैभव पुन्हा महाराष्ट्रात आणल्याशिवाय राहणार नाही, असेही ठाकरे म्हणाले.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) – काँग्रेस – राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) – शेतकरी कामगार पक्ष – स्वराज इंडिया – मित्र पक्ष महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ सांगवीतील पीडब्लूडी मैदानावर बुधवार (दि.8 मे) रोजी विराट सभा पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी मंत्री मदन बाफना, राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे,आपचे खासदार संजय सिंह, काँग्रेसचे चंद्रकांत हंडोरे, शिवसेना संपर्कप्रमुख तथा आमदार सचिन अहिर, सहसंपर्क प्रमुख आदित्य शिरोडकर, उपनेत्या किशोरी पेडणेकर, माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, जयदेव गायकवाड, शिवसेना राज्य संघटक एकनाथ पवार, शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले, कॉंग्रेसचे राष्ट्रीय सचिव पृथ्वीराज साठे, शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम, राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष तुषार कामठे, मावळ लोकसभा प्रचार प्रमुख योगेश बाबर, स्वराज इंडियाचे नेते मानव कांबळे, सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर, संभाजी ब्रिगेडचे प्रवक्ते गंगाधर बनबरे, माजी नगरसेवक मारुती भापकर, दत्तात्रय वाघेरे, बाबू नायर, सुलक्षणा धर, उषा वाघेरे, सुमन पवळे, असंघटीत कामगार विभागाचे काशिनाथ नखाते, कॉंग्रेसचे बाबू नायर, नरेंद्र बनसोडे, संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष प्रवीण कदम, सतीश काळे, अनिल रोहम, अमीन शेख, आम आदमी पार्टीचे पदवीधर प्रदेशाध्यक्ष चेतन बेंद्रे, महिला शहराध्यक्षा मीनाताई जावळे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) गटाच्या पिंपरी चिंचवड महिला शहराध्यक्षा ज्योतीताई निंबाळकर, शिवसेना शहर संघटिका अनिताताई तुतारे, समाजवादी पक्षाचे बि.डी. यादव, मावळ लोकसभेचे समन्वयक केश्रीनाथ पाटील, युवासेना प्रमुख चेतन (अण्णा) पवार, शरद पवार गटाचे इंजि. देवेंद्र तायडे, विशाल जाधव, माधव पाटील यांच्यासह सर्व घटक पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, दिल्लीश्वरांची चावी असलेल्या दोन माकडांना आणखी उद्धव बाळासाहेब ठाकरे हे नाव देखील घेता येत नाही. त्या माकडांना सांगतोय की बाप बदलण्याची गरज मला नाही, तुम्हाला आहे. माझ्या वडिलांचे नाव चोरून तुम्ही मते मागता. तुमच्या वडिलांचे नाव सांगितले, तर लोक दारात उभे करणार नाहीत. जो नकली शिवसेना म्हणेल, ते बेअकली आहे. त्यांच्याकडे आता काही मुद्दे राहिलेले नाहीत. मोदींना काही ठरवता येत नाही. पैसा पांढरा करणारा निर्णय होता, हे न्यायमूर्तींनी म्हटले होते.



### संजोग वाघेरेंना लोकसभेत पाठवा – उद्धव ठाकरे

» महाराष्ट्रात सर्वात पहिली उमेदवारी मी संजोग वाघेरे पाटील यांना जाहीर केली होती. त्यांचा प्रचार करण्याची गरज देखील आता उरलेली नाही. हे समोर बसलेला जनसमुदाय पाहून स्पष्ट झालेले आहे. त्यांना मावळमधून प्रचंड बहुमताने विजयी करून लोकसभेत पाठवा, असे आवाहन या जाहीर सभेतून उद्धव ठाकरे यांनी मावळ लोकसभा मतदारसंघातील जनतेला केले.

### आताच ते रस्त्यावर आले – ठाकरे

» भुताची भीती वाटली की राम राम म्हणायचे. आता यांना पराभवाची भीती वाटली की राम राम करत फिरतात. मोदीजी गल्लीबोळात प्रचारासाठी जात आहेत. मुंबईमध्ये तुम्हाला रोडशो करावा लागतो. मग, दहा वर्षात काय कमावले? आजच त्यांना रस्त्यावर आणले आहे. 4 जूनला आणखी रस्त्यावर आणणार आहोत. त्यांनी मागे अचानक टीव्हीवर येऊन नोटबंदी केली होती. तसेच मोदीजी 4 जूननंतर तुम्ही फक्त नरेंद्र मोदी राहाल. पंतप्रधान आमच्या इंडिया आघाडीचा होईल. तुम्ही जसे नोटाबंदी केली, तसा महाराष्ट्र तुमची नाणेबंदी करेल.

# जलवाहिनी फुटल्याने हजारो लिटर पाणी वाया

## पिंपरी-चिंचवड शहराच्या विविध भागात जलवाहिन्या फुटून हजारो लिटर पाणी वाया

**पिंपरी | प्रतिनिधी**

धरणातील पाणी पातळी घटत असताना पिंपरी-चिंचवड शहराच्या विविध भागात जलवाहिन्या फुटून हजारो लिटर पाणी वायाला जात आहे. दोन दिवसांपूर्वी दिघी येथे जलवाहिनी फुटून पाणी वाया गेले होते. तर बुधवारी (दि. 8) त्रिवेणीनगर चौकात मुख्य जलवाहिनी फुटून मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी झाली. त्यामुळे निगडी, यमुनानगर परिसरासह लगतच्या भागातील नागरिकांची मोठी गैरसोय झाली.

ऐन उन्हाळ्यात पाइपलाइन फुटण्याचे प्रकार वाढत असून त्यामुळे नागरिकांना पिण्यासाठी वितरित केले जाणारे पाणी वाया जात आहे. शहराला पाणी पुरवठा करणा-या पवना धरणातील पाणी पातळीत घट होत आहे. नागरिकांना दिवसाआड पाणी दिले जाते. या पाइपलाइनद्वारे निगडीतील यमुनानगर भागाला पाणीपुरवठा केला जातो. सकाळी पाणी सोडले जाते, दुपारी एक वाजेपर्यंत संपूर्ण भागाला पाणीपुरवठा केला जातो. परंतु, पाइपलाइन फुटल्याने सकाळी आठ वाजता या भागातील पाणीपुरवठा बंद करण्यात आला.

यमुनानगरसह त्रिवेणीनगर, निगडी गावठाण, सेक्टर 22, पीसीएमसी कॉलनी, कृष्णानगर भागातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला. पाण्याचा तबाव आल्याने पाइपलाइन फुटल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. सकाळी आठ वाजताच दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले. सायंकाळी सात वाजेपर्यंत काम पूर्ण होईल, त्यानंतर या भागाला पाणीपुरवठा करण्यात येईल, असे पाणी पुरवठा विभागाकडून सांगण्यात आले.



### मुख्य पाइपलाइन फुटून पाणी वाया

»बुधवारी त्रिवेणीनगर चौकात सकाळी आठ वाजता मुख्य पाइपलाइन फुटून मोठ्या प्रमाणात पाणी वाहून गेले. त्यामुळे निगडी गावठाण, यमुनानगर, सेक्टर 22, पीसीएमसी कॉलनी, कृष्णानगर भागातील पाणी पुरवठा बुधवारी सायंकाळी सात वाजेपर्यंत बंद ठेवावा लागणार असल्याचे पाणी पुरवठा विभागाकडून सांगण्यात आले होते.

# मतदारसंघापेक्षा त्यांना मालिकेचे शूटिंग महत्वाचे

## अजित पवार यांचा डॉ. कोल्हेंवर निशाणा : लोणीतील सभेत पाणीप्रश्न सोडविण्याचे आश्वासन

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.अमोल कोल्हे हे माझ्यावर टीका करतात की, मी पालकमंत्री असताना त्यांनी माझ्याकडे मतदारसंघासाठी निधी मागितला; मात्र मी दिला नाही असे ते खोटे बोलत आहेत. त्यांना मतदारसंघापेक्षा मालिकेचे शूटिंग महत्वाचे आहे.

आपल्या खासदाराने त्यांच्या कोपरे या दत्तक गावाच्या तोंडाला पाने पुसली. गेल्या पाच वर्षांत त्यांना चाकण येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवता आला नाही, वाहतूक कोंडीत लोकांचे दोन- दोन तास वाया जात आहे. त्यामुळे शिरूर लोकसभा मतदारसंघाच्या विकासासाठी शिवाजीराव आढळराव पाटील यांना दिल्लीत पाठवा, असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.



> जुलैमध्ये आम्ही महायुतीच्या सरकारमध्ये सामील झालो. त्यामुळे आंबेगावात 600 कोटींची कामे मार्गी लावता आली. 8 दिवसांत हिरड्याच्या नुकसानीची 17 कोटींची भरपाई दिली. जिल्हा नियोजनमधून आंबेगावसाठी 68 कोटी रुपये निधी दिला. सत्तेशिवाय काही उपयोग नाही, आम्ही जर सत्तेत नसतो तर ही कामे झाली असती का?
> - अजित पवार, उपमुख्यमंत्री

महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारार्थ लोणी (ता. आंबेगाव) येथे आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, भीमाशंकर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे, माजी सभापती मंगलदास बांदल, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विष्णू काका हिंगे, उद्योजक देवेंद्र अरुण गिरे, सविता बगाटे, जयसिंग एरंडे, सुनील बाणखिले, रूपालीताई भोजने, गणपतराव इंदोरे, रेवती वाडेकर, रवींद्र करंजखेले, मथाजी पोखरकर, अनिल डोके, महिला राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष सुषमाताई शिंदे, अनिल वाळुंज, महेंद्र वाळुंज, निलेश स्वामी थोरात, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी महेंद्र वाळुंज, विवेक वळसे पाटील, रवींद्र करंजखेले यांची भाषणे झाली.

अजित पवार म्हणाले, आंबेगाव तालुक्यातील लोणी, धामणी, वडगावपीर, मांदळवाडी, शिरदाळे तसेच सातगाव पठार, खेड, शिरूर, जुन्नर तालुक्यातील काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा तसेच शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. येथून आपल्या विचारांचा खासदार निवडून दिल्यास राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून पाण्याच्या विविध योजनेसाठी निधी उपलब्ध करून पाणीप्रश्न मार्गी लावू असे आश्वासन अजित पवार यांनी दिले. आपल्या खासदाराने त्यांच्या कोपरे या दत्तक गावाच्या तोंडाला पाने पुसली. पाणीटंचाईत तेथील महिलांना दोन ते अडीच किमी पायपीट करुन पाणी आणायला लागत असताना, त्यांनी गाव वाऱ्यावर सोडले. पण माझ्या संस्था आणि कार्यकर्त्यांकडून दोन महिन्यांपासून तेथे टँकर सुरु आहे. त्यामुळे कोणतेही काम न करता, आरोप करणाऱ्या निष्क्रीय खासदाराला त्याची जागा दाखवायलाच लागेल.

### खासदार नसतानाही मी जनतेसाठी काम केले

» पं विद्यमान खासदारांना फोन केला की त्यांचे पीए उचलतात व मीच खासदार बोलत आहे, असे सांगतात. खासदारांचा 80 टक्के निधी परत गेला, असे मी पेपरात वाचले. त्यामुळे जनतेने बिनकामाच्या खासदाराला घरी बसवावे. धरा वर्षे खासदार असताना व खासदार नसतानाही मी जनतेसाठी काम केले. जनतेच्या सुखदुःखात, लग्नाच्या, दशक्रियाच्या कार्यक्रमात सहभागी झालो, यात कमीपणा कसला? मी खासदार नसतानाही गावागावात निधी टाकण्यासाठी प्रयत्न केला आहे विविध विकासकामे मार्गी लावले आहेत.

# बिबट्याच्या हल्ल्यात मुलाचा मृत्यू काळवाडीतील घटना

## सकाळी साडेआठच्या सुमारास घडली असून परिसरात शोककळा पसरली

**पुणे | प्रतिनिधी**

बिबट्याच्या हल्ल्यात आठ वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बुधवारी (दि. 8) सकाळी साडेआठच्या सुमारास घडली असून परिसरात शोककळा पसरली आहे.

काळवाडी येथे यात्रेनिमित्त मामाच्या गावी आलेला रुद्र महेंद्र फापाळे (वय 8, रा. मूळगाव बदगीबेलापूर, ता.अकोले) सकाळी साडेआठच्या सुमारास आजोबा रोहिदास काकडे यांच्यासोबत शेतात गेला होता. जनावरांसाठी कडबा कुट्टी चे काम सुरू असताना शेजारी असलेल्या ऊसातून बिबट्याने रुद्र फापाळे या बालकावर अचानक हल्ला करून मान पकडली.

व उसात ओढत घेऊन गेला. बिबट्याने केलेले हल्ल्यात बालकाचा मृत्यू झाला आहे. बिबट्याच्या हल्ल्यात बालकाचा मृत्यू होण्याची ही सलग दुसरी घटना घडली असल्याने काळवाडी ग्रामस्थांनी वनविभागाच्या कार्यशैलीवर संताप व्यक्त केला आहे.



> घडलेली घटना दुर्दैवी असून वनविभागाला यापुर्वी बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा काळवाडी येथे लावावा अशी मागणी मी केली होती. त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले तसेच ही घटना घडल्यानंतर देखील वनविभागाचे अधिकारी घटना ठिकाणी लवकर हजर झाले नाहीत. वनविभाग या घटनांकडे गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे यावरून दिसत आहे
> – तुषार वामन, सरपंच, काळवाडी

दोन दिवसांपूर्वी पिंपळवंडी येथील एका तरुणीवर बिबट्याने हल्लाकरून तिला गंभीर जखमी केले होते. पिंपळवंडी ते काळवाडी हे अंतर अवघ्या तीन किलोमीटरचे आहे. तसेच दोन महिन्यांपूर्वी उंब्रज येथील साडेतीन वर्षीय बालक देखील बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झालेला होता. महिन्यापूर्वी शिरोली येथील एका मेंढपाळाचा मुलगा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडला होता.

बिबट्याच्या हल्ल्यात पाळीव प्राण्यांच्या मृत्युचे सत्र जुन्नरमध्ये खुप वर्षांपासून सुरू आहे. याबाबत शेतकरी वनविभागाला सहकार्य देखील करत होते. बिबट्यांचे मानवावर होणारे हल्ले वाढले असून लहान बालकांना हकनाक मृत्यूला सामोरे जावे लागत आहे.

### बिबट्यांना शूट करा – शेरकर

» जुन्नर तालुक्यात बिबट्यांची संख्या वाढली असल्याने मानववरचे हल्ले वाढू लागले आहेत. जनतेचा उद्रेक लक्षात घेऊन बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरे, नसबंदी बाजूला ठेवून बिबट्यांना शूट करण्याची मागणी विघ्नहरचे अध्यक्ष सत्यशील शेरकर यांनी केली आहे. यावेळी स्थानिकांचा मोठा जमाव उपस्थित होता. तालुक्यातील वनविभाग बंद करून शासनाला बिबटे आटोक्यात येत नसतील तर कारवाई जनतेच्या हातात द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.